INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.71 (SJIF 2021)

# ग्रामीण महिलांच्या समस्यांचा अभ्यास : काळाची गरज

**सौ.चित्रलेखा श्रीमंत ढोले**
उपाध्यक्षा, JBVP लाखेवाडी
लाखेवाडी, ता.इंदापूर, जि.पुणे

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/09.2021-91213887/IRJHIS2109012

***सारांश :-***

*प्रत्येक देशातील अर्धी मानवी शक्ती ही स्त्री आहे. पुरुषांप्रमाणे स्त्रियाही देशाच्या विकासाला हातभार लावत असतात. पण संस्कृतीने 'स्त्री शक्तीला' बंदिस्त केल्यामुळे ही 'स्त्री शक्ती' अडगळीत पडली पण आजच्या बदलत्या परिस्थितीमुळे स्त्रियांच्या स्थितीमध्ये परिवर्तन होत आहे. महिला चळवळी, महिला सबलीकरण, क्रांतिकारक विचार पुढे आले. परंतु आजही माझी ग्रामीण महिला, माता, भगिनी या सामाजिक, आर्थिक तसेच आरोग्यविषयक समस्यांना सामोरे जात आहेत. या समस्यांवर प्रकाश टाकणे व त्या सोडविणे ही काळाची गरज आहे. तरचं खऱ्या अर्थाने सर्व स्त्री जातीचा सन्मान होणार आहे. त्यासाठी केलेला हा छोटासा प्रयत्न!*

***महत्वाचे शब्द :-*** *स्त्री, ग्रामीण महिलांच्या समस्या, सामाजिक, आर्थिक, आरोग्यविषयक समस्या*

**प्रस्तावना :-**

'शाश्वत, विश्वास, दृढपरिचय, वात्सल्य, सन्मान, महत्त्वाकांक्षा आणि आत्मसमर्पण यांचे मूर्तिमंत प्रतिक म्हणजे स्त्री', आणि म्हणूनच प्रत्येक देशातील अर्धी मानवी शक्ती ही स्त्री आहे. पुरुषांप्रमाणे स्त्रियाही देशाच्या विकासाला हातभार लावत असतात. पण संस्कृतीने 'स्त्री शक्तीला' बंदिस्त केल्यामुळे ही 'स्त्री शक्ती' अडगळीत पडली. पारंपारिक भारतीय समाजाचा विचार करता महिला विविध क्षेत्रात वंचित राहिल्या. 'चूल आणि मूल' हेच तिचे कार्यक्षेत्र मानले जात होते, परंतु आता त्याचे परिणाम गंभीर स्वरुपात पुढे आले आणि स्त्री प्रश्नांना चालना मिळाली. सुरूवातीला या प्रश्नाकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा सहानुभूतीचा होता. पण त्यानंतर त्यांच्याकडे मानवी अधिकाराच्या कक्षेतून पहिले गेले, यातूनच स्त्री चळवळ व स्त्री हक्कांची संकल्पना पुढे आली.

'परिवर्तन' हा निसर्गाचा नियम आहे. त्यामुळे आज बदलत्या परिस्थितीनुसार स्त्रियांच्या स्थितीमध्ये परिवर्तन होत आहे तेव्हा 'जगा आणि जगूद्या' या मानवाधिकारांच्या कक्षेतून स्त्रियांकडे पहिले जाऊ लागले. मनुष्य जेव्हा जन्म घेतो तेव्हा त्याला जीवन जगण्याचा अधिकार मिळाला पाहिजे आणि याच दृष्टीकोनातून जगामध्ये महिला चळवळीचा प्रारंभ झाला. महिला 'अबला' न राहता 'सबला' असून तिला समाजनिर्मित बंधन, आचार, विचार, व्यवहार यामुळे दुय्यमत्त्व प्राप्त झाले आहे. त्याचा प्रतिकूल परिणाम तिच्या विकास आणि प्रगतीवर होतो. म्हणून ही बंधने दूर करून तिला विकासाच्या संधी व पोषक वातावरण निर्माण करून दिले पाहिजे, असा विचार पुढे आला आणि यातूनच महिला सबलीकरणाची संकल्पना पुढे येऊन या प्रश्नांचा गांभीर्याने विचार सुरू झाला. 'सबलीकरण म्हणजे एक माणूस म्हणून माणसासारखे जगण्याचा अधिकार प्राप्त होणे असा आहे' पण आर्थिक, सामाजिक, राजकीय,इ. सर्वच क्षेत्रांचा विचार केला तर स्त्रीची उपेक्षा जन्मापासूनच सुरू होते. प्रत्येक बाबतीत तिच्या वाट्याला दुजाभाव येतो. पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये पुरूषमूल्ये जपण्याचा आपण जास्तीत जास्त प्रयत्न करतो. टी.व्ही, चित्रपटांमध्येही तेच दाखविले जाते. पूजा, व्रत, वैकल्ये यातच स्त्रिया अडकलेल्या दिसतात. स्त्री कितीही हुशार, व्यवहारचतुर कर्तृत्ववान असली तरी तिला गुलाम तथा क्षुद्राप्रमाणे ज्ञानाचा, विचाराचा, मत अधिकार नाकारला गेला आणि त्यांनी केवळ घरकाम, प्रजोत्पादन व भरण पोषणाचे काम करावे अशी समाज व्यवस्था उभी केली गेली.

पुढे या विचाराला आधुनिक काळात विशेषतः १९व्या शतकात स्त्री विचारवंत किंवा उदारमतवादी यांनी आव्हान दिले. यामध्ये मेरी वोल्स्टन, जॉन स्टुअर्ड, डेव्हिस हे आंतरराष्ट्रीय व न्या.रानडे, म.फुले, सावित्रीबाई फुले, र.धो.कर्वे, धोंडो केशव कर्वे, पंडिता रमाबाई, वि.रा.शिंदे, डॉ.आंबेडकर,इ. भारतीय विचारवंतांनी पुरुषांप्रमाणे महिलांही विवेकी व विचारक्षम आहेत. तसेच सार्वजनिक जीवनात संघर्ष करून शिक्षण, विचार, मतदान, संपत्ती,इ. अधिकार आणि स्त्री-पुरुष समानतेचा, स्त्री शिक्षणाचा विचार मांडला. यातूनच सामाजिक सुधारणा चळवळीतून स्त्रियांच्या सबलीकरणास चालना मिळाली.

महिलांचे सबलीकरण ही बहुआयामी व बहुमुखी वैशिष्ट्ये असणारी प्रक्रिया आहे. महिलांचा सर्वांगीण विकास होण्यास निगडीत अशी ही संकल्पना आहे. मात्र अशा चळवळी, क्रांतिकारक प्रक्रिया चालू असताना सुद्धा ग्रामीण भागातील माता-भगिनी आजही सामाजिक, आर्थिक, मानसिक तसेच आरोग्यविषयक समस्यांना तोंड देत आहेत. कोणत्याही समाजाच्या वास्तविक परिस्थितीचा आढावा घ्यायचा ठरल्यास एक महत्त्वाचे माध्यम म्हणजे त्या समाजातील महिला व विशेष करून ग्रामीण महिलांची परिस्थिती काय आहे? हे जाणून घेणे. या महिलांना काय अधिकार

आहेत तसेच त्यांच्या जीवनातील अनेक मूलभूत समस्याचा आढावा घेणे क्रमप्राप्त आहे. भारतीय इतिहासाचा आढावा घेतला असता वरवर पाहता स्त्रियांचा गौरव करण्यात आलेला आहे. परंतु प्राचीन काळापासून ते आजपर्यंत महिलांच्या वाट्याला दुय्यम स्थानचं आले आहे. त्यातल्या त्यात ग्रामीण महिलांची स्थिती समाधानकारक नाही. ग्रामीण महिलांचे सामाजिक, शारीरिक, मानसिक व बौद्धिक दृष्टीकोनातून पुरुषांच्या तुलनेत अधिक शोषण झालेले दिसते. त्यामुळे समाज व राष्ट्र उभारणीच्या प्रक्रियेपासून ग्रामीण महिलांचा एक मोठा वर्ग उपेक्षित राहिला आहे. त्यामुळे समाजाच्या सर्वांगीण विकास प्रक्रियेत बाधा येते. संयुक्त राष्ट्रसंघाच्या मते ग्रामीण विकास, अन्न सुरक्षा आणि गरिबांचे निवारण यामध्ये ग्रामीण महिलांचे योगदान आहे. त्यामुळे ग्रामीण महिलांची स्थिती सुधारण्याच्या दृष्टीने पोषक वातावरण निर्माण करणे, लिंगभेद, आर्थिक व आरोग्यविषयक समस्यांचा अभ्यास करणे हे आजच्या काळात अतिशय आवश्यक आहे. तसेच सामाजिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण जबाबदारी आहे.

**ग्रामीण महिलांच्या सामाजिक समस्या :-**

ग्रामीण महिलांच्या सामाजिक समस्यांचा अभ्यास करीत असताना सर्वप्रथम सामाजिक समस्या या एखाद्या समाजातील लक्षणीय संख्येच्या व्यक्तींच्या सामाजिक वर्तनातील बिघाड समाजातील इतर सदस्यांना त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतात. समाजाकडून, कुटुंबाकडून महिलांना विविध प्रकारे त्रास दिला जातो. यात प्रामुख्याने :-

**1. कौटुंबिक समस्या :-**

यामध्ये पुरुषप्रधान संस्कृती, पती-पत्नींमधील अंतर, मुलगा-मुलगी भेदभाव, हुंडापद्धती व अत्याचार, स्त्रियांना दुय्यम स्थान, तिच्या मतांचा अनादर, पुरुषांची मनमानी, व्यसनाधीनता, चारित्र्याचा संशय, अंधश्रद्धा, जुन्या रूढी परंपरा,इ. विविध समस्यांचा समावेश होतो.

**2. शिक्षणाबाबत उदासिनता :-**

घरातील मुलींनी, महिलांनी शिकून काय करायचे अशा विचारांमुळे मुलींना शिक्षण दिले जात नाही. आजही ग्रामीण महिला शिक्षण क्षेत्रात मागे आहेत. किशोरवयातचं मुलींचे लग्न करणे, आई-वडील कामाला गेल्यानंतर घरची भावंडे सांभाळणे, घरच्या जनावरांकडे लक्ष देणे,इ. जबाबदाऱ्यांमुळे शिक्षणाबाबत उदासिनता दिसून येते.

**3. विवाह व हुंडापद्धती:-**

ग्रामीण भागात मुलींचा विवाह लवकर केला जातो. त्यामुळे लहान वयातच मुलींवर, महिलेवर कुटुंबाची जबाबदारी पडते. शारीरिक विकास न झाल्यामुळे तिला लहान वयातच गर्भधारणा, गर्भपात या समस्यांना तोंड द्यावे लागते.

याशिवाय भारतामध्ये पूर्वपार हुंडापद्धत अस्तित्वात आहे. भारतातील प्रत्येक प्रांतात, जाती-धर्मात आणि ग्रामीण भागात आजही हुंडापद्धती मूळ धरून आहे. या भयानक समस्येचा बळी मात्र प्रामुख्याने स्त्रियाचं जात आहे.

**4. सामाजिक विकृती :-**

आजही ग्रामीण भागात स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन निकोप व निरोगी नाही. स्त्रियांबाबत चर्चा करणे, त्यांच्यावर सामाजिक बंधने घालणे, पेहरावाची बंधने, जातीवाचक बोलणे, स्त्री-पुरुष भेद करणे,इ. अनेक समस्या असतात.

**ग्रामीण महिलांच्या आर्थिक समस्या :-**

आज आपण विज्ञान तंत्रज्ञानाच्या जगात जगत आहोत तरी देखील ग्रामीण महिलांना अति शारीरिक कष्ट केल्याशिवाय पर्याय नसतो. मग ती महिला सुशिक्षित असो वा अशिक्षित, उच्चवर्णीय असो वा मागासवर्गीय, स्त्री म्हणजे कष्ट हे समीकरण ठरलेले आहे. ग्रामीण भाग हा कृषीप्रधान आहे. त्यामुळे महिला घरचे आवरून शेतमजुरी करून अर्थार्जन करतात. पण तरी ती मजुरी किंवा तिला मिळणारे वेतन पुरुषांच्या तुलनेत कमी असते. तिच्या वेतनावर तिचा हक्क नसतो. स्त्रिया शेतमजुरी बरोबरच पशुपालन, दुग्धव्यवसाय, शेळीपालन, कुक्कुट पालन,इ. छोट्या-मोठ्या व्यवसायातून पैसा उभा करत असतात. पण आलेला पैसा त्या कुटुंबासाठी, मुलांच्या शिक्षणासाठी खर्च करण्यास पतीकडे देत असतात. परंतु स्वतःच्या गरजेसाठी, कामासाठी पैसे खर्च करण्याचे स्वातंत्र्य तिला नाही. कुटुंबासाठी त्या आर्थिक बचत करू शकत नाहीत. काहीवेळ व्यसनी पती तिचे पैसे घेऊन स्वतःचे व्यसन करतो. अशा एक ना अनेक आर्थिक समस्या असतात.

**ग्रामीण महिलांच्या आरोग्यविषयक समस्या :-**

आधुनिक भारतात परिवर्तनाचे वारे जोमाने वाहत असले तरीही ग्रामीण भागातील स्त्रियांच्या आरोग्यविषयक प्रश्नांकडे दुर्लक्ष झालेले दिसते. स्त्रियांच्या आरोग्याचा संबंध केवळ स्त्रियांशी निगडीत आहे असे नाही तर स्त्रियांच्या आरोग्याचा प्रश्नांची सुरुवात कुपोषण, अस्वच्छता, शिक्षणाचा अभाव, आरोग्यविषयक सुविधांचा अभाव व मानसिक-शारीरिक ताण-तणाव यामधूनच स्त्रिया अनेक आजाराला बळी पडतात. यामध्ये आजारांकडे दुर्लक्ष, अपत्य न होणे, गर्भधारणा व गर्भपात, स्तनांचा व गर्भाशयाचा कर्करोग, मधुमेह, हृदयविकार, मणक्यांचे आजार व सांधेदुखी, कुपोषण, शारीरिक व मानसिक ताण, स्वच्छतागृहे, शौचालयांचा अभाव अशा अनेक समस्यांचा समावेश होतो. अशा महिलांना काही वेळ चिडचिड, नैराश्य, मानसिक थकवा यांसारख्या समस्यांनाही सामोरे जावे लागते.

अशा प्रकारे आपल्या भारतीय कुटुंब व्यवस्थेमध्ये पुरुषांपेक्षा महिलांचे योगदान अधिक आहे.

कारण पुरुष जेव्हा घराबाहेर नोकरी किंवा इतर काम करत असतो तेव्हा घर सांभाळणे, कुटुंबातील अडीअडचणी, वयस्कर माणसांची सुश्रुषा, आजारपणे, मुलांचे पालनपोषण,इ. ही सर्व कामे महिलांनाच करावी लागतात. आपल्याकडे पुरुषप्रधान संस्कृती असल्यामुळे महिलांच्या या जबाबदाऱ्यांकडे महत्त्वपूर्ण दृष्टीकोनातून पहिले जात नाही. ग्रामीण भागात तर हा दृष्टीकोन पाहायला व ऐकायलाही मिळत नाही. आजही ग्रामीण महिलांचे प्रश्न, समस्या सुटलेले नाहीत. पूर्वीपेक्षा आजच्या परिस्थितीत किती तरी बदल होत आहेत. ताठ मानेने जगू पाहणाऱ्या या महिलेला आधार देणे व त्यांच्या जीवनात समस्या कमी करणे ही काळाची गरज आहे नव्हे तर ती समाजात प्रत्येकाची नैतिक जबाबदारीच आहे.

**समारोप :-**

आजच्या बदलत्या परिस्थितीनुसार स्त्रियांच्या स्थितीमध्ये परिवर्तन होत आहे. महिला चळवळी, महिला सबलीकरण यांसारख्या संकल्पना पुढे आल्या. परंतु आजही ग्रामीण भागातील माता-भगिनी सामाजिक, आर्थिक, मानसिक तसेच आरोग्यविषयक समस्यांना तोंड देत आहेत. या लेखाच्या माध्यमातून मी ग्रामीण महिलांच्या काही समस्यांवर धावता प्रकाशझोत टाकला आहे, कारण आज ही ग्रामीण महिला या सामाजिक, आर्थिक, आरोग्यविषयक समस्यांमधून बाहेर पडणे त्या समस्यांचा अभ्यास होणे ही काळाची गरज आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :-**

1. स्त्री प्रश्नांची चर्चा-प्रतिभा रानडे (१९९१)
2. ग्रामीण समाजशास्त्र
3. सामना, प्रहार, सकाळ, लोकमत - वर्तमानपत्रातील लेख